विभाग प्रमुखांना/प्रादेशिक प्रमुखांना महाराष्ट्र नागरी सेवा [वेतन] नियम, १९८१ च्या नियम ५६ अन्वये अतिरिक्त कार्यभार सांभाळल्यामुळे विशेष वेतन/अतिरिक्त वेतन मंजूर करण्याबाबत अधिकाराचे प्रत्यायोजन.

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,
शासन निर्णय क्रमांक: वेतन १०९१/प्र.क्र.१४६/सेवा-३,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २ जानेवारी १९९२.

वाचा :- १] शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक: पीएवाय-१२८३/सीआर-१९१/एसईआर-७, दिनांक २ जानेवारी १९८५.

शासन निर्णय :- शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-पीएवाय-१२८३/सीआर १९१/एसईआर-७, दिनांक २ जानेवारी १९८५ अनुसार महाराष्ट्र नागरी सेवा [वेतन] नियम, १९८१ चे परिशिष्ट-१ मधील बाब क्रमांक १४ अन्वये त्या समोरील स्तंभ ६ मध्ये नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून, विभाग प्रमुख आणि प्रादेशिक प्रमुख यांना, नियम ५६ अन्वये अतिरिक्त वेतन/विशेष वेतन मंजूर करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. शासन आता असे आदेश देत आहे की, महाराष्ट्र नागरी सेवा [वेतन] नियम, १९८१ मधील नियम ५६ अन्वये खाली नमूद केलेल्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत सहा महिन्यांच्या कालावधीकरिता अतिरिक्त वेतन/विशेष वेतन मंजूर करण्याचे अधिकार विभाग प्रमुख/प्रादेशिक प्रमुख यांना प्रदान करण्यात येत आहेत :-

१] वर्ग-२ पदाचा अतिरिक्त कार्यभार धारण करणाऱ्या त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील वर्ग-२ चा अधिकारी.

२] ज्या अराजपत्रित शासकीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती करू शकतात अथवा जे त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली येतात असे शासकीय कर्मचारी.

२. वरील आदेश दिनांक २ जानेवारी १९९२ पासून अंमलात येतील. अशा प्रकारची प्रकरणे प्रलंबित असल्यास ती या आदेशाप्रमाणे निकालात काढण्यात यावीत.

३. महाराष्ट्र नागरी सेवा [वेतन] नियम, १९८१, परिशिष्ट-१ मधील याबाबतच्या विद्यमान तरतुदी या शासन निर्णयाच्या तरतुदीपुरत्या सुधारण्यात आल्या आहेत असे मानण्यात यावे. उक्त परिशिष्टातील त्या तरतुदी यथावकाश सुधारण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

मंगला म. कोरगांवकर,
शासनाच्या उप सचिव.

[कृ.मा.प.]

जिल्हाधिकारी कार्यालय,
रत्नागिरी.
12 MAR 1992
शाखा-
प्र.लि. नि. व लि. जिल्हाधिकारी

शा.म.मु. रोटा/वि. वि./एच-८५४[१५,०००+१०-२-९२]

आध्यापक/रावा



प्रति,

महालेखापाल-१ [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-२ [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र, नागपूर,
महालेखापाल-१ [लेखा परीक्षा], महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-२ [लेखा परीक्षा], महाराष्ट्र, नागपूर,
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
मंत्रालयीन-सर्व विभाग,
मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख, प्रादेशिक प्रमुख व कार्यालय प्रमुख,
• प्रबंधक, उच्च न्यायालय [मूळ शाखा], मुंबई,
• प्रबंधक, उच्च न्यायालय [अपील शाखा], मुंबई,
• सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
• सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
• प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
सिनियर रिसर्च ऑफिसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय
[व्यय विभाग], खोली क्रमांक २६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली,
मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई,
उप मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/
नाशिक/अमरावती,
जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड फाईल, वित्त विभाग, सेवा-३.

---

• पत्राद्वारे.

मप-८५४[१५,०००+१०-२-९२]-३